जा.क्र. पोआ/६९१(क)/२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक :- ९ .१२.२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक ०१.१२.२०२० चे ००:०१ ते दिनांक ३१.१२.२०२० चे २४:०० वा.च्या दरम्यानचा जमावबंदीचा आदेश. (पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील कंन्टेन्मेन्ट झोन वगळून उर्वरीत क्षेत्रासाठी)**

**आदेश –**

२. ज्या अर्थी जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषीत केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे, असे दिसुन येत आहे. राज्य शासनाने कोरोना विषाणु (कोवीड - १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचे रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३.०३.२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केली आहे. त्याबाबतची नियमावली तयार केली आहे. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २३.११.२०२० अन्वये कोव्हिड- १९ चे नियंत्रणासाठी राज्यात यापुर्वी जारी करण्यात आलेल्या लॉकडाऊन आदेशाची मुदत दि. ३१.१२.२०२० अखेर वाढविलेली आहे आणि कोव्हिड - १९ चे प्रतिबंधासाठी राज्यात वाढवलेल्या लॉकडाऊनच्या मुदतीसाठी सुधारित मार्गदर्शक सुचना जारी केल्या आहेत.

३. भारत सरकार आरोग्य मंत्रालय, तसेच महाराष्ट्र सरकार आरोग्य मंत्रालय यांनी कोरोनाग्रस्त रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवु नये, अशा मार्गदर्शक सुचना पारित केल्या आहेत. तसेच **सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येणे थांबणे किंवा चर्चा करणे,** तसेच कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणुंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस व आस्थापना यांना उद्देशुन काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

४. त्याअर्थी मी **कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिचंवड,** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील घोषित कंन्टेन्मेन्ट झोन्स व्यतिरिक्त उर्वरीत क्षेत्रासाठी फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ०१.१२.२०२० चे ००:०१ ते दिनांक ३१.१२.२०२० चे २४:०० वा. पर्यंत जमावबंदीचा आदेश लागु करीत आहे.**

**५. संपुर्ण राज्यात खालील बाबींना मनाई असेल –**

i) शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था दि. ३१.१२.२०२० पर्यंत बंद राहतील. परंतु ऑनलाईन शिक्षण /दुरस्थ शिक्षण यांना परवानगी राहील. तसेच ५० टक्के पर्यंत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गास ऑनलाईन / दुरस्थ शिक्षणाबाबत कामकाज करणेसाठी शाळा , कॉलेज, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था, कोचिंग क्लासेस मध्ये येवुन कामकाज करणेसाठी परवानगी असेल याबाबतची स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) शिक्षण विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल.

ii) केंद्रीय गृहविभागाने परवानगी दिलेल्या आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुक वगळता इतर आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुकीस मनाई राहील.

iii) सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम व सभा, संमेलने, इतर मेळावे यांना आणि मोठया संख्येने एकत्र जमण्यास बंदी राहील.

iv) सर्व धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे नागरीक/ भाविकांसाठी बंद राहतील.

**६.कोव्हीड १९ व्यवस्थापनाच्या अनुषंगाने राष्ट्रीय निर्देश :-**

**अ) सार्वजनिक ठिकाणाकरीता निर्देश :-**

Scanned with CamScanner

१. **तोंडावर मास्क परिधान करणे** - सर्व सार्वजनिक ठिकाणी, कामाचे ठिकाणी आणि वाहतुकी दरम्यान नागरीकांनी तोंडावर मास्क परिधान करणे बंधनकारक आहे.

२. **सामाजिक अंतर** - सर्व सार्वजनिक ठिकाणी प्रत्येक नागरीकाने किमान ६ फुट अंतर (२ गज की दुरी) सामाजिक अंतर राखणे अनिवार्य आहे. दुकानदार हे दुकानांमध्ये खरेदीसाठी येणा-या ग्राहकांमध्ये शारिरीक अंतर पाळले जाईल याची खात्री करतील आणि एका वेळी ५ पेक्षा जास्त ग्राहकांना परवानगी देणार नाहीत.

३. **मेळावे / सार्वजनिक कार्यक्रम** - मोठे सार्वजनिक मेळावे / कार्यक्रम तसेच मोठया संख्येने लोकांना एकत्र येण्यास मनाई राहील. **लग्न सोहळयासारख्या कार्यक्रमांना ५० पेक्षा जास्त लोकांना परवानगी नाही. अंत्यविधी / अंतिम संस्कार सारख्या कार्यास २० पेक्षा जास्त लोकांना परवानगी नाही**

४. **सार्वजनिक ठिकाणी थुंकणे** हे दंडनिय असेल. त्यानुसार सक्षम प्राधिकारी हे कायदयातील अधिनियमातील तरतुदीनुसार किंवा नियमानुसार नियमन व कार्यवाही करतील.

५. **सार्वजनिक ठिकाणी मदय, पान, तंबाखु इत्यादी खाण्यास सक्त मनाई आहे.**

**ब) कार्यालयीन ठिकाणाकरीता अतिरिक्त निर्देश :-**

१. **घरातुन काम करणे (WFH)** - जास्तीत जास्त शक्य तो घरातुन काम करण्याच्या कार्यपध्दतीचा वापर करावा. कार्यालये, कामाची ठिकाणे, दुकाने, मार्केट्स आणि औदयोगीक व वाणिज्य आस्थापना या ठिकाणी कार्यालयीन कामकाजाचा तासाप्रमाणे आळीपाळीने वाटपाच्या कार्यपध्दतीचा अंवलंब करावा.

२. **स्क्रिनिंग आणि स्वच्छता** - कामाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर येण्याच्या व जाण्याच्या ठिकाणी आणि सर्व सामान्य क्षेत्रात थर्मल स्कॅनिंग, हॅन्डवॉश व सॅनिटायझरची उपलब्धता करावी.

३. **वारंवार सॅनिटायझेशन** - कामाच्या ठिकाणाचे तसेच तेथील सामान्य सुविधांचे व लोकांच्या सतत संपर्कात येणा-या बाबींचे वेळोवेळी तसेच शिफ्टस् दरम्यान संपुर्ण सॅनिटायझेशन करावे. उदा. दरवाजाचे हॅन्डल्स

४. **सामाजिक अंतर** - सर्व कामाच्या ठिकाणांचे प्रभारी यांनी कामाच्या ठिकाणी सामाजिक अंतर पाळले जात असल्याबाबत खात्री करावी. कामगारांच्या व कर्मचा-यांच्या कामाच्या शिफ्टस् आणि भोजनाचे वेळा टप्याटप्याने ठेवाव्यात.

**७. असुरक्षित व्यक्तींच्या संरक्षणाबाबत :-**

६५ वर्षावरील जेष्ठ नागरिक, विकलांग व्यक्ती, गरोदर महिला आणि दहा वर्षाखालील मुले यांनी अत्यावश्यक आणि वैदयकीय कारण वगळता घरातच थांबणे आवश्यक आहे.

**८. आरोग्य सेतुच्या वापराबाबत :-**

१. आरोग्य सेतु ॲप हे कोरोना संसर्गाच्या संभाव्य जोखमीची अगोदर ओळख करण्यास मदत करते. आणि ते व्यक्तींस आणि समाजास ढाल म्हणुन मदत करते.

२. कार्यालये व कामाच्या ठिकाणी सुरक्षितता ठेवण्याच्या दृष्टीने अनुरुप मोबाईल फोन असलेल्या सर्व कर्मचा-यांनी आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी.

३. नागरीकांनी त्यांच्या मोबाईल फोनवर आरोग्य सेतु ॲप डाउनलोड करावे व त्यांची आरोग्य विषयक दैनंदिन माहिती अदययावत करावी.

**९. सर्व अत्यावश्यक बाबींची दुकाने यापुर्वी दिलेल्या आदेशाप्रमाणे खुली राहतील.**

**१०. यापुर्वी वेळोवेळी पारीत केलेल्या आदेशामधील परवानगी दिलेल्या बाबी यापुढेही सुरु राहतील आणि मागील सर्व आदेश या आदेशासह दिनांक ३१.१२.२०२० रोजी पर्यंत अंमलात राहतील.**

**११. खालील सर्व बाबींना अटीच्या अधिन राहुन परवानगी राहील -**

I. हॉटेल/फुड कोर्टस्/रेस्टॉरंट आणि बार यांना दिनांक ०५.१०.२०२० पासुन ५० टक्के क्षमतेने किंवा मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पुणे. व आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी विर्निदीष्ट केलेप्रमाणे परवानगी राहील. सदर आस्थापना सुरु ठेवताना त्याबाबत करावयाच्या आवश्यक उपाययोजनांबाबतची प्रमाणीत कार्यपद्धती शासनाच्या पर्यटन विभागाकडुन जारी केली जाईल.

Scanned with CamScanner

II. ऑक्सीजनची वाहतुक करणा-या वाहनांना आंतरराज्य व राज्यांतर्गत वाहतुकीस कोणत्याही वेळेच्या बंधनाशिवाय परवानगी राहील. तसेच सक्षम प्राधिकारी यांनी ऑक्सीजन उत्पादक व पुरवठादार यांच्या वाहनांची कोणत्याही बंधनाशिवाय वाहतुक होत असलेबाबत खात्री करावी.

III. राज्यात प्रवास सुरु होवुन राज्यातच प्रवास संपणा-या सर्व रेल्वे गाडया राज्य व केंद्र सरकारने वेळोवेळी ठरविलेल्या कोव्हीड - १९ संदर्भातील प्राटोकॉलच्या आधीन राहुन त्वरीत प्रभावाने पुन्हा सुरु करण्यात येतील.

IV. पुणे विभागातील लोकल रेल्वे गाडया एमएमआर विभागातील प्रोटोकॉल व कार्यपध्दतीनुसार पुन्हा सुरु केल्या जातील. त्याबाबत समन्वय करण्यासाठी मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर हे नोडल अधिकारी असतील.

V. राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण केंद्र, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ किंवा राज्य कौशल्य विकास अभियान किंवा भारत सरकार किंवा महाराष्ट्र सरकारच्या इतर मंत्रालयामध्ये नोंदणीकृत असलेल्या अल्पकालीन प्रशिक्षण केंद्रात कौशल्य किंवा उदयोजकता प्रशिक्षण घेण्यास परवानगी असेल. राष्ट्रीय उदयोजकता आणि लघु व्यवसाय विकास संस्था (एन आयईएसव्हीयुडी ), भारतीय उदयोजक संस्था, आणि त्यांच्या प्रशिक्षण देणा-या व्यक्तींनादेखील परवानगी दिली जाईल. याबाबत आरोग्य व कुंटुंब कल्याण मंत्रालयामार्फत निर्गमित केलेल्या मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक राहील.

VI. उच्च शिक्षण संस्थांमध्ये ऑनलाईन/दुरुस्थ शिक्षण हे कायम राहील. तथापि केवळ संशोधन अभ्यासक, पीएचडी करणारे विदयार्थी, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील पदव्युत्तर विदयार्थ्यांसाठी प्रयोग शाळेतील/ प्रयोगिक कामांची आवश्यकता असल्यास खालीलप्रमाणे सुरु करण्यास परवानगी असेल :-

**अ)** केंद्रीय अर्थसहाय्यीत उच्च शिक्षण संस्थांमधील प्रमुखांचे मते विज्ञान आणि तंत्रज्ञानात पदव्युत्तर शिक्षण घेणारे विदयार्थी/ पीएचडी करणारे विदयार्थी यांना प्रयोग शाळेत प्रायोगिक कामे करण्याची आवश्यकता असल्यास परवानगी असेल.

**ब)** सर्व उच्च शिक्षण संस्थासाठी उदा. राज्य विदयापीठे, खाजगी विदयापीठे इत्यादी, केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील पदवीधर, पदव्युत्तर, पीएचडी करणारे विदयार्थी यांना प्रायोगिक कामे करण्याची आवश्यकता असल्यास परवानगी असेल. याबाबत उच्च शिक्षण विभागामार्फत स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक राहील.

VII. सर्व सरकारी व खाजगी ग्रंथालयांना कोव्हिड - १९ बाबतच्या सामाजिक अंतर आणि स्वच्छतेचे नियम पाळुन सुरु करण्यास परवागनी असेल याबाबत उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक राहील.

VIII. मेट्रो रेल्वे सेवा चालु राहतील याबाबत नगरविकास विभागामार्फत स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक असेल.

IX. कंन्टेमेंन्ट झोनबाहेर व्यावसायिक प्रदर्शनांना परवानगी असेल, याबाबत उदयोग विभागामार्फत स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक राहील.

X. कंन्टेमेंन्ट झोन बाहेर आठवडे बाजारास परवानगी असेल, याबाबत मनपा मार्फत स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक राहील.

XI. कन्टेन्मेट झोन बाहेर व्यायामशाळा सुरु करण्यास परवानगी असेल याबाबत राज्य सरकार,मनपा यांनी वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे / मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) निर्गमित करण्यात आलेली आहे. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) / अधिसुचनांचे पालन व्यायामशाळा (व्यायामशाळा कर्मचारी, सभासद, अभ्यंगत इ.)यांना करणे बंधनकारक राहील.

Scanned with CamScanner

xii. कंटेनमेंट झोनचे बाहेर दिनांक ५ नोव्हेंबर २०२० पासुन योगा प्रशिक्षण वर्ग चालु करणेस परवानगी असेल. याबाबतची स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत निर्गमित करणेत येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक असेल.

xiii. कंटेनमेंट झानेचे बाहेर दिनांक ५ नोव्हेंबर २०२० पासुन बॅडमिंटन, टेनिस, स्कॅश इनडोअर नेमबाजी इत्यादी सारखे खेळ शारीरीक आंतर व स्वच्छते बाबतचे (physical distance and sanitation measures) सर्व यिम पाळुन खेळण्यास परवानगी असेल.

xiv. कंटेनमेंट झानेचे बाहेर दिनांक ५ नोव्हेंबर २०२० पासुन सिनेमा गृह / प्रेक्षागृह / मल्टीप्लेक्स सिनेमा गृह त्यांच्या ५० टक्के क्षमते पर्यंत चालु करणेस परवानगी असेल. सिनेमा गृह / प्रेक्षागृह / मल्टीप्लेक्स सिनेमा गृहामध्ये खाद्य पदार्थ घेऊन जाण्यास मज्जाव असेल.याबाबतची स्वतंत्र मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) सांस्कृतिक विभागामार्फत निर्गमित करणेत येईल. सदर मार्गदर्शक कार्यप्रणाली (sop) नुसार कामकाज चालु ठेवणे बंधनकारक असेल.

xv. **उपरोक्त आदेशांव्यतिरीक्त शासनाच्या इतर विशेष/सर्वसाधारण आदेशांनुसार परवानगी दिलेल्या बाबीं यापुढेही चालु राहतील. तसेच यापुढे राज्यशासन, जिल्हाधिकारी, मनपा यांचेकडून वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश लागू राहतील.**

xvi. **परिच्छेद ५ मध्ये ज्या बाबींना मनाई केलेली आहे अशा बाबींवरील निर्बंध कमी करणे किंवा त्याबाबी सुरु करणे हे टप्प्या टप्प्याने प्रमाणीत कार्यपद्धतीचा अवलंब करुन भविष्यात केले जाईल.**

टीप :-

१. वरील नमुद सर्व सवलत दिलेले संबंधित अधिकारी कर्मचारी खाजगी व्यक्ती यांनी त्यांचे नेमणुकीचे आदेश ओळखपत्र याबाबतचा पुरावा सोबत बाळगणे बंधनकारक आहे.

२. वर नमुद ठिकाणी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी आरोग्य विभागाकडुन देण्यात आलेल्या आवश्यक त्या सर्व प्रतिबंधात्मक तसेच सामाजिक अंतर ठेवण्याबाबतच्या उपाययोजनांची दक्षता संबधीत कार्यालये,दुकान, आस्थापना यांचे चालक मालक, कार्यालय प्रमुख व्यवस्थापक यांनी घ्यावी.

३. रुग्ण वाहतुकीवेळी संबंधित रुग्णांनी दवाखान्यातील उपचाराबाबतची कागदपत्रे सोबत बाळगावीत.

४. कोरोना प्रतिबंधक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी नेमणुक केलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी त्याबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

५. नमुद सवलतींच्या निकषांची पुर्तता करतेवेळी सर्व संबंधितांनी कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव टाळणेकरिता आरोग्य विभागाकडुन सुचित केलेल्या खबरदारीच्या उपायांचे **(उदा - मास्क, हॅण्डग्लोव्हज, सॅनिटायझर यांचा वापर तसेच सामाजिक अंतर ठेवणे)** काटेकोर पालन करणे अनिवार्य राहील.

१२. सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ मधील कलम ५१ ते ६० नुसार आणि साथीचे रोग कायदा १८९७ तसेच प्रचलित कायदयातील तरतुदींनुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. या बाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त, तसेच परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक ९ .१२.२०२० रोजी दिलेला आहे.

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड

ठिकाण :- पिंपरी चिंचवड
दिनांक :- ९ .१२.२०२०

Scanned with CamScanner